# लिंगभाव, आरोग्य व समाजाचा परस्परसंबंध : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**संतोष ए. कावरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
मो. नं. 9604748638
ई मेल : kaware12sa@gmail.com

***सारांश :***

*लिंगभाव, आरोग्य आणि समाज यांचा परस्परसंबंध समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. विविध समाजव्यवस्थांमध्ये लिंगभावाचे भिन्न आकलन आणि त्याचा शरीराच्या आरोग्यावर होणारा प्रभाव यावर सखोल चर्चा केली जाते. लिंगभावानुसार तयार होणाऱ्या सामाजिक, मानसिक, आणि शारीरिक आरोग्याच्या अडचणी समाजातील विविध गटांमध्ये भिन्नपणे दिसून येतात. तसेच, या त्रिसुत्रीतील प्रत्येक घटकाचा परस्परांवर प्रभाव सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यासला जातो. महिलांचे आरोग्य, पुरुषांच्या मानसिकतेतील बदल, तृतीयपंथी समुदायाच्या आरोग्यविषयक समस्या आणि समाजातील लिंगभेद यांचा परस्पर संबंध या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. या संशोधन लेखात  लिंगभावाच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय संदर्भांचा उहापोह करून, आरोग्यविषयक धोरणांचे पुनर्निर्माण करण्याच्या दृष्टीने एक नवा दृष्टिकोन सुचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

**बिजसंज्ञा:** लिंगभाव, लिंगभेद, मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य, तृतीयपंथी.

**प्रस्तावना :**

लिंगभाव, आरोग्य आणि समाज यांचा परस्पर संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. लिंगभाव हे आपल्या समाजातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक घटक आहे, ज्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्व निर्धारित होत असते. लिंगभाव आणि आरोग्य यांचा थेट संबंध असतो, कारण लिंगाच्या आधारावर व्यक्तीचे मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्य विविध प्रकारे प्रभावित होत शकते. समाजात लिंगानुसार  विविध भूमिका, वर्तन आणि अपेक्षा बदलत असतात. लिंगानुसार आरोग्याच्या संदर्भात देखील बदल होतांना दिसून येते. जसे की, मानसिक दबाव, शारीरिक आजार, लिंगभेद, आणि लैंगिक हिंसा ई.

लिंगभाव आणि आरोग्य यामधील संबंधी विविध समस्या आपल्याला समाजात दिसून येतात. जसे की, महिलांचा आरोग्याच्या बाबतीत अनेक समस्या दिसून येतात. तसेच पुरुषांवरील सामाजिक दबाव, आणि इतर लिंग-आधारित असमानतेचे परिणाम, या सर्व गोष्टी एकाच मुद्द्यावर केंद्रीत आहेत. यामुळे समाजात लिंगभेद आणि आरोग्यविषयक दृष्टीकोनातून विचार होणे गरजेचे आहे.

लिंगभाव आणि आरोग्य यासंबंधी संशोधन करतांना, समाजाच्या विविध स्तरांवर प्रभाव टाकणारे

Research Hub International Journal

तत्त्वज्ञान, धोरणे, आणि सामाजिक संरचनांचा विचार केला जातो. समाजाची संरचना ही अतिशय गुंतागुंतीची असून समाजापरत्वे रूढी, प्रथा, परंपरा या वेगवेगळ्या असलेल्या दिसून येतात. या रूढी, प्रथा, परंपरांचा प्रभाव लिंगभावावरती पडत असतो. आणि त्यातूनच त्या-त्या समाजातील व्यक्तीची स्थिती हि निश्चित होत असते. त्यामुळे आरोग्याच्या सेवांचा समान वितरण, लिंग आधारित हिंसा व असमानतेची निर्मूलन, आणि सर्वांसाठी चांगले आरोग्य सुनिश्चित करण्याच्या दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. लिंगभावाच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
2. लिंगभावामुळे महिलांवरील मानसिक व शारीरिक त्रास आणि त्याचे आरोग्यावर होणारे दीर्घकालीन परिणाम जाणून घेणे.
3. लिंगभाव, आरोग्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध समजून घेऊन सामाजिक बदलांच्या गरजेचा अभ्यास करणे.
4. आरोग्य सेवेतील लिंगसमर्थन आणि समानतेच्या बाबतीत सुधारणा यांचा अभ्यास करणे.

**लिंगभाव, आरोग्य व समाज : परस्परसंबंधाचे सखोल विश्लेषण :**

"लिंगभाव, आरोग्य व समाज" या विषयावर चर्चा करत असताना, आपल्याला या त्रिसूत्रीतील तीन घटकांचा परस्परसंबंध समजून घेतला पाहिजे: लिंगभाव (Gender Identity), आरोग्य (Health), आणि समाज (Society). हे घटक परस्परावलंबी असून, समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून त्यांचा परस्परसंबंध सखोलपणे अभ्यासण्याची आवश्यकता आहे.

**लिंगभाव (Gender Identity) :**

लिंगभाव म्हणजे व्यक्तीला आपल्या लिंगाबद्दल असलेली मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव. ही जाणीव जैविक लिंगाशी संबंधित असली तरी ती केवळ त्यापुरती मर्यादित नसते. म्हणजेच, एखादी व्यक्ती जन्मतः स्त्री किंवा पुरुष या श्रेणीत येत असली, तरी तिची लिंगभावाची ओळख ही त्या जैविक लिंगाशी जुळेलच असे नाही. अनेक व्यक्ती स्वतःला तृतीयलिंगी, ट्रान्सजेंडर, जेंडरक्विअर अशा विविध रूपांत अनुभवतात.

समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहता, लिंगभाव ही सामाजिक बांधणी आहे. बालवया पासूनच समाज व्यक्तीवर स्त्री अथवा पुरुष म्हणून विशिष्ट वर्तन, अपेक्षा आणि भूमिका लादतो. ही भूमिका पाळण्यासाठी व्यक्तींवर सामाजिक दबाव निर्माण होतो. त्या व्यक्तीने ती भूमिका पार पाडावी या हेतूने त्याचे सामाजीकरण करण्यावरती भर दिला जात असतो. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या अंतरात्म्याशी सुसंगत असलेल्या लिंगभावानुसार वागत नाही किंवा समाजाच्या पारंपरिक चौकटीबाहेर जाते, तेव्हा तिला भेदभाव, उपेक्षा आणि छळ यांचा सामना करावा लागतो. याचा थेट परिणाम तिच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होतो.

**आरोग्य (Health) :**

Research Hub International Journal

आरोग्याची स्थिती मात्र आजारांवर निश्चित होत नसून व्यक्तीचे शारीरिक, मानसिक स्थितीनुसार त्याचा परिणाम व्यक्तीच्या आरोग्यावर पडत असतो. लिंगभावाच्या संदर्भात आरोग्याच्या संकल्पनेचा विचार करताना, आपल्याला समजते की आरोग्य ही संज्ञा प्रत्येक व्यक्तीसाठी समान नाही. लिंगभावाच्या आधारावर आरोग्याच्या गरजा, समस्यांचे स्वरूप, आणि आरोग्यसेवेतील अनुभव वेगळे असतात. उदा. ट्रान्सजेंडर किंवा तृतीयपंथीय व्यक्तींना त्यांच्या लिंग ओळखीच्या अनुषंगाने शारीरिक बदलांसाठी हार्मोन थेरपी, सर्जरी किंवा समुपदेशनाची गरज भासते. मात्र, आरोग्य सेवा पुरवणाऱ्या आरोग्य संस्था अनेकदा त्यांच्या या गरजांकडे दुर्लक्ष करतात, किंवा त्यासाठी योग्य तज्ज्ञ, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध नसतात. याशिवाय, लिंगभावावर आधारित भेदभावामुळे त्या व्यक्तींना सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये असहकार, अपमान, आणि उपेक्षा सहन करावी लागते.

तसेच, स्त्रियांच्या संदर्भात गर्भधारणा, मासिक पाळी, रजोनिवृत्ती यांसारख्या विशिष्ट आरोग्यविषयक गरजा असतात, तर पुरुषांमध्ये कधीकधी मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते कारण "पुरुष रडत नाहीत", "पुरुष दुर्बल नसतात" अशा सामाजिक रूढी त्यांना भावनिक अभिव्यक्तीपासून रोखतात. अशा प्रकारची सामाजिक बंधने पुरुषांच्या मानसिक आरोग्यविषयक समस्यांना जन्म देऊ शकतात.

**समाज (Society) :**

समाज म्हणजे परस्पर संबंधित व्यक्तींचा एकत्रित समूह, ज्यामध्ये विशिष्ट मूल्ये, परंपरा, संस्कृती आणि रूढी प्रचलित असतात. समाज लिंगभावाच्या स्वीकारामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. व्यक्तीच्या लिंगभावाच्या अनुषंगाने तिची सामाजिक ओळख निश्चित होत असते. ही ओळख स्वीकारण्याची किंवा नाकारण्याची क्षमता समाजाच्या मानसिकतेवर आणि संरचनेवर अवलंबून असते.

पारंपरिक समाज रचनेमध्ये लिंगाचे वर्गीकरण हे स्त्री आणि पुरुष या दोनच संकल्पनांमध्ये मर्यादित होते. या संकल्पनेतून इतर कोणतेही लिंग मान्य नव्हते. त्यामुळे ट्रान्सजेंडर, नॉन-बायनरी किंवा इतर लिंग ओळखी असलेल्या व्यक्तींना समाजात जागा मिळत नव्हती. यामुळे त्यांना सामाजिक तिरस्कार, शैक्षणिक आणि आर्थिक संधींमध्ये मर्यादा, तसेच कौटुंबिक आणि वैयक्तिक संबंधांमध्ये दुजाभाव अनुभवावा लागत होता.

समाजातील शिक्षण, माध्यमे, धर्म, कायदे आणि आरोग्य व्यवस्था हि सर्व घटके लिंगभावाच्या संकल्पनांना मजबुती देतात किंवा त्यांना आव्हान देतात. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, हे स्पष्ट होते की समाजाच्या स्वीकृतीशिवाय लिंगभावाशी संबंधित व्यक्तींच्या आरोग्यात सकारात्मक बदल घडवणे शक्य नाही.

**परस्परसंबंध आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोन :**

लिंगभाव, आरोग्य आणि समाज हे तीनही घटक एकमेकांवर प्रभाव टाकतात. व्यक्तीचा लिंगभाव त्या समाजातील असणाऱ्या रूढी, परंपरा, दृष्टीकोन निश्चित करीत असतात. सोबतच व्यक्तीच्या आरोग्यविषयक समस्येवर देखील व्यक्तीचा लिंगभाव प्रभाव टाकत असतो. त्या गरजांची पूर्तता किंवा उपेक्षा ही समाजाच्या आरोग्यविषयक दृष्टीकोनावर अवलंबून असते. समाजातील लिंगभाव कशास्वरूपाचा आहे, यावरून त्या व्यक्तीच्या

आरोग्यसेवांमध्ये तिला काय अनुभव येतील, हे ठरत असते.

समाजशास्त्रात लिंगभावाच्या विश्लेषणासाठी "समाज निर्मित लिंग" (Socially Constructed Gender) ही संकल्पना फार महत्त्वाची आहे. ही संकल्पना सांगते की स्त्री किंवा पुरुष यासंबंधित भूमिका समाजाने घडवलेल्या आहेत आणि हा लिंगभाव समाजापरत्वे भिन्न-भिन्न स्वरूपात दिसून येतो. प्रत्येक समाजात असलेला लिंगभाव हा प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्गत लिंगभावाशी जुळतीलच असे नाही. त्यामुळे आरोग्यविषयक धोरणे आणि सेवा तयार करताना ही सामाजिक गुंतागुंत लक्षात घेणे गरजेचे आहे. यासोबतच, फेमिनिस्ट थिअरी, क्विअर थिअरी, आणि इंटरसेक्शनॅलिटी या समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून देखील लिंगभावाच्या अनुभवांचे विश्लेषण करता येते. या सिद्धांतांनी हे अधोरेखित केले आहे की, लिंग, जात, वर्ग, धर्म, शहरी/ग्रामीण पार्श्वभूमी अशा अनेक घटक एकत्रितपणे व्यक्तीच्या सामाजिक अनुभवांना आकार देत असतात. त्यामुळे आरोग्यविषयक धोरणे करताना हे सर्व घटक समाविष्ट करून व्यापक आणि समावेशक आरोग्यदृष्टीकोन विकसित केला पाहिजे.

**निष्कर्ष :**

लिंगभाव, आरोग्य आणि समाज यांचा परस्पर संबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. लिंगभावाच्या ओळखीवर आधारित समाजात व्यक्तीला त्या-त्या समाजानुसार वागणूक मिळत असते. त्याचा त्याच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर प्रत्यक्ष प्रभाव पडतो. लिंगभावाच्या संदर्भातील आव्हानांना तोंड देताना व्यक्तीला समाजातील लिंगाधारित भेदभाव, असमानता आणि पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे आरोग्याच्या समस्यांचा उदय होऊ शकतो. जेव्हा समाज या मुद्द्यांचा समतोल राखेल आणि समंजस दृष्टिकोनातून विचार करेल, तेव्हा व्यक्तीच्या पर्यायाने समाज जीवनाची गुणवत्ता सुधारू शकते.

समाजाने लिंगभावाच्या विविधतेला स्वीकारले पाहिजे, आणि आरोग्य सेवा व समाजिक धोरणं लिंगभावाच्या आधारावर असमानता आणि भेदभाव कमी करण्यासाठी कार्यरत राहिली पाहिजे. बदलत्या समाजात, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या लिंगभावानुसार समान अधिकार आणि संधी मिळाव्यात, हे सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी समाजाच्या लिंगभेद मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आरोग्य आणि जीवनाच्या निवडीबद्दल आदर आणि समर्पण मिळू शकेल. शेवटी, लिंगभाव, आरोग्य व समाज यांचा परस्पर संबंध सामाजिक समतेचे आणि मानवाधिकारांच्या रक्षणाचे महत्त्व दर्शवितो.

**शिफारशी :**

1) समाजात लिंगभावाच्या विविधतेला स्वीकारण्याची गरज आहे, ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या लिंगभावानुसार समान वागणूक आणि अधिकार मिळतील.

2) आरोग्य सेवेतील असमानता कमी करण्यासाठी, लिंगभावाच्या आधारावर भेदभाव आणि अडचणी दूर करण्यासाठी विशेष धोरणे तयार केली पाहिजेत.

3) लिंगविषयक भेदभावामुळे होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक समस्यांवर उपचार करण्यासाठी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

4) समाजातील लिंगभावावर आधारित पूर्वग्रह आणि दुराग्रह कमी करण्यासाठी शालेय आणि सार्वजनिक जीवनात योग्य शिक्षण आणि संवाद वाढवून त्या अनुशंगाने सामाजीकरण झाले पाहिजे.

5) लिंगभावामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झालेल्या व्यक्तींना मानसिक व शारीरिक स्वास्थ्याचे संरक्षण मिळवण्यासाठी मानसिक आरोग्य सेवा आणि मदत केली पाहिजे.

**संदर्भ**:


- तिवारी, एस. (2020). *लिंगभाव, आरोग्य व समाज: एक विश्लेषण*. पुणे: विद्या प्रकाशन.
- वाधवा, एस. (२००३). समाजशास्त्र: अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली.
- Butler, Judith. *Gender Trouble*. Routledge, 1990.
- Foucault, Michel. *The History of Sexuality*. Vintage, 1990.


Research Hub International Journal